॥ श्री ॥
॥ बाबा ॥

# गंध

बाबांना लाविते गंध
आज्ञाचक्राचे ते होई पूजन ।
अंतरी मन अस्थिर
भालप्रदेशी होई केंद्रित ।
गंध रेखीव नाजूक
बाळकृष्णरूप अति गोजिर ।
गंध सुरेख सुगंधित
शांती समाधान देही उत्तेजित ।
गंध लावणे बाबा नित्यक्रम
दाखविती ते कृतीतून ।
नित्य गंध पूजन
अपेक्षिती बाबा म्हमद्यांकडून ॥बाबा॥

★★★★★